दिल्लीत पं. बिरजू महाराजांकडून कथक नृत्याचे धडे गिरवून पुण्यात आलो. 'बालगंधर्व'मधील बालगंधर्वांच्या चित्रांनी प्रभावित झालो. बालगंधर्वांची नाट्यपदं ऐकली आणि नजरेसमोर उभ्या राहिल्या प्राचीन नाट्यशास्त्रातील अष्टनायिका... कथक नृत्याद्वारे या अष्टनायिकांना साकारण्याची अभिनय कल्पना सुचली. बालगंधर्वांच्या जन्मशताब्दीनिमित्त २६ जून १९८७ रोजी 'बालगंधर्व'मध्येच या अष्टनायिका सादर केल्या त्या अलौकिक अनुभवाविषयी...

२६ जून १९८७! बालगंधर्व रंगमंदिर रसिक प्रेक्षकांनी तुडुंब भरलं होतं. अगदी उभं राहण्यासही जागा अपुरी पडत होती. बालगंधर्व जन्मशताब्दी सोहळ्याचा शुभारंभ होता. रसिक उत्कंठेनं कार्यक्रम सुरू होण्याची वाट पाहत होते, अन् त्याच वेळी पडदा उघडतो. रंगमंचावर संपूर्ण अंधार. प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचलेली. एवढ्यात नाट्यगीताचे बोल कानावर पडतात, 'नाथ हा माझा मोहि मना', त्याचबरोबर एक प्रकाशझोत रंगमंचावर पडतो अन् एकापाठोपाठ एक बालगंधर्वांच्या गीतांद्वारे नायिका साकार होताना दिसतात. बालगंधर्वांच्या आठवणींना उजाळा मिळतो. प्रेक्षक मंत्रमुग्ध होऊन ५० वर्षांपूर्वीच्या काळात हरवतात; नृत्य, नाट्य, गायन यांच्या त्रिवेणी संगमानं न्हाऊन निघतात.



बालगंधर्वांचं नाट्यसंगीत प्रथमच नृत्याद्वारे सादर झालं. ही कल्पना प्रथमच रंगमंचावर साकारली गेली. रसिकांनी या कार्यक्रमास अक्षरशः डोक्यावर घेतलं. सर्व वृत्तपत्रांनी या कार्यक्रमास गौरवलं.

अशा या कार्यक्रमाच्या अनेक सुखद आठवणी मी माझ्या हृदयपटलात साठवून ठेवल्या आहेत. हा कार्यक्रम करण्याची कल्पना सुचणं अन् त्याला मूर्त रूप देणं, त्यासाठी करावयास लागणारी तयारी, त्यासाठी घेतलेली मेहनत, या सर्वच बाबींना विशेष महत्त्व आहे.

कथक नृत्यात सतत नवनवीन प्रयोग करण्याची माझी इच्छा. त्यामुळे रशियात असताना रशियन भाषेतील गाणं मॉस्कोला कथक नृत्याद्वारे सादर केलं. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानंतर दिल्लीत 'सुखकर्ता दुखहर्ता' ही गणेश आरती कथक नृत्याद्वारे सादर केली. याला खूप लोकप्रियता मिळाली. या अनुभवातून नवीन प्रयोग करण्याची जिज्ञासा वाढली. त्या वेळी मी गुरू पं. बिरजू महाराज यांच्याकडे गुरु-शिष्य परंपरेनुसार कथक नृत्याचं शिक्षण घेत होतो. भारत सरकारची राष्ट्रीय शिष्यवृत्ती नृत्यासाठी मिळविणारा मी पहिला महाराष्ट्रीयन नर्तक. दिल्ली इथे दहा वर्षं कथक नृत्याचं शिक्षण घेऊन मी १९८६ साली पुण्यात आलो व 'नंदकिशोर कल्चरल अकादमी' स्थापन केली. एकदा बालगंधर्व रंगमंदिरात गेलो अन् तिथे भिंतीवर लावलेली बालगंधर्वांची छायाचित्रं पाहिली. त्यामुळे खूपच प्रभावित झालो. त्यानंतर बालगंधर्वांच्या नाट्यसंगीताच्या कॅसेट आणल्या व त्या ऐकल्या.

नाट्यसंगीत ऐकत असताना त्या प्रत्येक नाट्यसंगीतात मला एक-एक नायिका आढळली. स्वाधीनपतिका, वासकसज्जा, प्रेषित भर्तृका,



# ‘कथक’मध्ये रंगल्या बालगंधर्वांच्या अष्टनायिका...

■
डॉ.पं.नंदकिशोर कपोते
■
ज्येष्ठ कथक नृत्यकलावंत

विरहोत्कंठिता, विप्रलब्धा, खंडिता, कलहान्तरिता, अभिसारिका या भरतमुनी यांच्या प्राचीन नाटचशास्त्रातील अष्टनायिका. या अष्टनायिकांची बालगंधर्वांच्या नाट्यसंगीताशी सुरेख गुंफण घालून ते नाट्यसंगीत कथक नृत्याद्वारे सादर करण्याची कल्पना सुचली. १९८७ हे बालगंधर्वांचं जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरं होणार होतं. त्यामुळे या जन्मशताब्दीनिमित्त बालगंधर्वांच्या नाट्यसंगीतावर नृत्य करण्याचा मी पक्का निर्धार केला. केवळ नृत्यच नाही, तर बालगंधर्वांची स्त्री-भूमिकासुद्धा नृत्याद्वारे साकार करायची, ही कल्पना घरी बोलून दाखविली. काहींनी थोडा विरोध दर्शविला, परंतु या वेळी वडिलांनी संपूर्ण पाठिंबा दिला. त्यामुळे माझाही उत्साह द्विगुणित झाला.

मग बालगंधर्वांवरील माझा अभ्यास सुरू झाला. त्यासाठी बालगंधर्वांवर लिहिले गेलेले लेख, पुस्तकं वाचली. त्यांनी साकारलेल्या प्रत्येक स्त्री-भूमिकेचा बारकाईनं अभ्यास केला. त्यासाठी बालगंधर्वांनी गाजवलेल्या संगीत स्वयंवर, संगीत सौभद्र, विद्याहरण, मृच्छकटिक, संशयकल्लोळ इ. नाटकांचं वाचन केलं. बालगंधर्वांना पाहिलेल्या ज्येष्ठ कलाकारांशी, व्यक्तींशी चर्चा केली. त्यामुळे बालगंधर्वांच्या व्यक्तिरेखेची ओळख झाली.

आणि त्यानंतर ‘नाथ हा माझा मोहि मना’, ‘मधुकर वन वन फिरत करी गुंजारबाला’, ‘किती किती सांगू तुला’, ‘मजवरी तयांचे प्रेम खरे’, ‘नाही मी बोलत’, ‘नरवर कृष्णा समान’, ‘संशय का मनी आला’, ‘मला मदन भासे हा’, ‘वद जाऊ कुणाला शरण गं’ या नाट्यगीतांची नृत्यासाठी निवड केली. यासाठी बालगंधर्वांच्या शैलीत गाणाऱ्या गायिकेची आवश्यकता होती. या वेळी पौर्णिमा तळवळकर यांचं नाव समोर आलं. (मराठी चित्रपटांतील प्रसिद्ध अभिनेते शरद तळवळकर यांच्या पौर्णिमा तळवळकर पत्नी.) पौर्णिमा तळवळकरांनी गायनाची जबाबदारी स्वीकारली, तर सुधीर गाडगीळ यांनी निवेदनाची बाजू भक्कमपणे सांभाळली आणि तालमी सुरू झाल्या. २६ जून १९८७ पासून बालगंधर्वांचं जन्मशताब्दी वर्ष साजरं होणार होतं, त्यामुळे २६ जून या दिवशीच कार्यक्रमाचा शुभारंभ करण्याचं ठरविलं. त्यासाठी बालगंधर्व रंगमंदिरच बुक केलं.

बालगंधर्वांची ही सर्व प्रसिद्ध नाट्यगीतं एका कथेमध्ये गुंफली, अष्टनायिकांनी सजवली व कथक नृत्याचा त्यावर साज चढवला. शास्त्रीय संगीताचा चांगला पाया लाभलेल्या सर्व गाण्यांना कथक नृत्यशैली अतिशय पूरक ठरली. पूर्वी ही गाणी केवळ श्रवणीय होती; आता ती प्रेक्षणीय झाली. अशा तऱ्हेचा संपूर्ण कार्यक्रम करणं ही कल्पना संपूर्ण महाराष्ट्रात सर्वस्वी नवीन होती.

२६ जून १९८७चा हा कार्यक्रम अविस्मरणीय ठरला. या कार्यक्रमाच्या वेळेस झालेल्या दोन मजेशीर घटना आजही आठवल्या की हसायला येतं. कार्यक्रम सुरू होणार होता. मी बालगंधर्वांची स्त्री-भूमिका करणार याची कुणालाच कल्पना नव्हती. तशी जाहिरातही केली नव्हती. मी बालगंधर्वांच्या स्त्री-भूमिकेत ग्रीनरूममध्ये आरशासमोर उभा राहून तयारी करत होतो. त्याच वेळी पुण्यातील नर्तिका मनीषा साठे व मीरा पंडोल मला कार्यक्रमाच्या शुभेच्छा देण्यासाठी भेटायला आत आल्या; परंतु मला न ओळखून त्या ‘कपोते कुठं आहेत?’ म्हणून सर्वांना विचारत मला माझ्याचसमोर शोधत राहिल्या. तेव्हा त्यांना कुणी तरी माझ्याकडे हात दाखवून ‘हे काय कपोते तुंमच्या समोर उभे आहेत’ म्हणाले. यावर ‘अय्या’ म्हणून त्या आश्चर्यचकित झाल्या व मलाही हसायला आलं.

तसंच, तालमीच्या वेळी मी साध्या




●●

बालगंधर्वांची सर्व प्रसिद्ध नाट्यगीतं एका कथेमध्ये गुंफली, अष्टनायिकांनी सजवली व कथक नृत्याचा त्यावर साज चढवला. शास्त्रीय संगीताचा चांगला पाया लाभलेल्या सर्व गाण्यांना कथक नृत्यशैली अतिशय पूरक ठरली. पूर्वी ही गाणी केवळ श्रवणीय होती; आता ती प्रेक्षणीय

●●



पोशाखात तालीम (रिहर्सल) करीत असे. माझ्या साथसंगतकारांना मी स्त्रीवेष करणार आहे याची किंचितही कल्पना नव्हती. ज्या वेळी कार्यक्रम सुरू झाला व रंगमंचावर माझं बालगंधर्वांच्या स्त्री-भूमिकेत आगमन झालं व 'नाथ हा माझा' या नाट्यगीतावर मी बालगंधर्वांच्या व्यक्तिरेखा साकारू लागलो, त्या वेळी मला संगत करणारे तबलावादक व बाकी संगतकार संभ्रमात पडले, की या बाई कोण? रंगमंचावर या बाई कशा आल्या? या गाण्यावर तर कपोते नृत्य करणार होते. प्रेक्षक स्तिमित होऊन नृत्य पाहत होते. नृत्य संपल्यावर निवेदक सुधीर गाडगीळ यानं सांगितलं, की आत्ताच आपल्यासमोर नंदकिशोर कपोते स्त्री-भूमिकेत नृत्य करत होते. यावर प्रेक्षकांनी टाळ्यांच्या प्रचंड गजरात त्याचं स्वागत केलं आणि रसिकांच्या या पसंतीच्या पावतीनं माझा हा प्रयोग यशस्वी झाला आहे याचा मला लगेचच प्रत्यय आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून बालगंधर्वांच्या शैलीतील ज्येष्ठ गायिका, नाट्य अभिनेत्री स्व. सुहासिनी मुळगावकर मुंबईहून आल्या होत्या. हाही मोठा भाग्याचा क्षण होता. संपूर्ण कार्यक्रम पाहून सुहासिनी मुळगावकर आपल्या भाषणात म्हणाल्या होत्या, ''हा नूतन आविष्कार पाहायला खरोखर रमणीय वाटला. बालगंधर्वांनी जर त्या काळी आपल्या गाण्याबरोबर नृत्याविष्कार दाखविला असता तर कसा दिसला असता याचं आज प्रात्यक्षिकच पाहायला मिळालं. गोपीकृष्ण, बिरजू महाराज यांच्यानंतर पुढच्या पिढीमध्ये नृत्याचं काय होणार, असं पूर्वी वाटायचं; पण आजचं नृत्य पाहून ही परंपरा अत्यंत चांगल्या तऱ्हेनं पुढं चालू राहणार आहे याची खात्री पटली.''



यानंतर मी हे कार्यक्रम नाशिक, मुंबई व पुण्यात अनेक वेळा सादर केले. २६ जून १९८८ रोजीही बालगंधर्व जन्मशताब्दी समारोपाच्या दिवशी टिळक स्मारक मंदिरात हा कार्यक्रम सादर करण्यात आला. या वेळी असंख्य नाट्यरसिक, नाट्य कलावंत आवर्जून उपस्थित होते. सर्वांनी या कल्पनेचं कौतुक केलं.

यानंतर मुंबई दूरदर्शनद्वारेही 'नरवर कृष्णासमान' या नावानं हा कार्यक्रम प्रसारित झाला आणि संपूर्ण महाराष्ट्रानं या कार्यक्रमावर स्तुती सुमनांचा वर्षाव केला. दूरदर्शनवरील कार्यक्रमात नृत्याबरोबर नाट्यसंगीत गायलं होतं प्रसिद्ध गायिका क्षमा वैद्य यांनी.

हा कार्यक्रम माझ्या आयुष्यातील एक अनमोल ठेवा आहे. कारण बालगंधर्वांनी स्वतः त्यांच्या नाटकांत जी वस्त्रं, शालू, शेला, फेटा इ. परिधान केलं होतं, तीच वस्त्रं, शालू, शेला, फेटा मला इतक्या वर्षांनंतर बालगंधर्वांचे पुतणे श्री. राजहंस यांच्याकडून माझ्या या कार्यक्रमात मला परिधान करावयास मिळाली. हा एक दिव्य चमत्कार आहे. मी स्वतःला भाग्यवान समजतो. हा बालगंधर्वांनी मला दिलेला प्रसाद आहे, आशीर्वाद आहे.

●●